महाराष्ट्र शासन
वन विभाग
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.**
**O/o Principal Chief Conservator of Forests(HoFF) Maharashtra State**

**Phone - 0712-2549563**
pccfwlngp@mahaforest.gov.in
www.mahaforest.gov.in

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State**
**"Van Bhavan"3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001.**

क्रमांक :-कक्ष-२३(४)/प्र.क्र.१२३/ ३८१२ /२०२५-२६, दिनांक :- ०२ /०१/२०२६

प्रति,

१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/वनसंरक्षक (प्रा.) (सर्व),
२. क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व),
३. उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे/पुणे/नाशिक.
४. विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) (सर्व)

**विषय**- वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मानव मृत्यू झाल्यास करावयाची कार्यवाही व सादर करावयाचे अहवाल.

**संदर्भ**- या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(४)/प्र.क्र.१२३(२०१९-२०)/४३७९/दि.२९.११.२०२४.

वरील संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, वन्यप्राण्याचे हल्ल्यात मानव मृत्यू झाल्यास त्या बाबत संपुर्ण राज्यात पुढील करावयाची कार्यवाही बावद एकरुपता नाही त्यामुळे प्रकरणात जे तपशीलवार चौकशी आवश्यक आहे, ते वेळेवर होत नाही. राज्यात "वन्यप्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान या करिता नुकसान भरपाई प्रदान करणे, महाराष्ट्र अधिनियम, २०२३" अस्तित्वात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३ (२) परंतुक मध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. की "वन्यप्राणी रस्ता ओलांडताना झालेल्या वाहन अपघातामुळे झालेली कोणतीही इजा किंवा नुकसान हे नुकसान भरपाई करीता विचारात घेतले जाणार नाही " असे असुनही क्षेत्रीय कर्मचारी असे प्रकरण स्विकारतात व मौका पंचनामा सुध्दा करतात व नंतर विशेष बाब म्हणून प्रकरण वरिष्ठ कार्यालयाला सादर करतात ही बाब योग्य नाही, तरी या बाबत क्षेत्रीयस्तरापर्यंत (वनरक्षक) लेखी सुचना जारी होतील याची दक्षता घ्यावी.

**वन्यप्राण्याचे हल्ल्यात मानव मृत्यू झाल्यास त्या प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर होणा-या कार्यवाहीत एक सुत्रता राहावी यासाठी खाली प्रमाणे प्रोटोकॉल जारी करण्यात येत आहे.**

१. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मानवी मृत्यू झाल्याची माहिती मिळताच जवळचे वन कर्मचा-यांनी त्वरीत घटनास्थळी पोहोचावे.
२. प्राथमिक पाहणी केल्यावर त्या कर्मचा-यांनी स्थानिक पोलिस तसेच वरिष्ठ वन अधिका-यांना तात्काळ कळवावे आणि घटनास्थळ सुरक्षित करावे, जेणेकरुन पगमार्क्स , ओढण्याच्या खुणा, रक्ताचे डाग, वनस्पतींचे नुकसान किंवा इतर वन्यप्राण्यांच्या उपस्थितीच्या खुणा नष्ट होणार नाहीत.
३. संबंधित वनपरिक्षेत्र अधिका-यांनी पोलिस अधिका-यांसोबत घटनास्थळाची संयुक्त पाहणी करावी आणि चाव्याच्या खुणा, नखांच्या जखमा, चिरडण्याच्या खुणा, ओढण्याच्या खुणा किंवा खादनाच्या खुणा यांसारख्या जखमांच्या प्रकारांची काळजीपूर्वक तपासणी करुन योग्य नोंद करण्यात यावी.
४. मृतदेह हलविण्यापूर्वी शक्य असल्यास मृतदेह, जखमा व सभोवतालच्या परिसराचे जिओ-टॅग व वेळेसह (टाइम-स्टँम्प) छायाचित्रे व व्हिडिओ घेण्यात यावेत.
५. पोलिस विभागामार्फत पंचनामा झाल्यानंतर मृतदेह शासकिय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात यावे. वन कर्मचारी या कामात पुर्ण सहकार्य करतील.
६. वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी वैद्यकिय अधिका-यांचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये मृत्यूचे कारण स्पष्टपणे नमुद आहे तसेच जखमा वन्यप्राण्यांच्या हल्ल्याशी सुसंगत आहेत की नाही, हे स्पष्ट असल्याची खात्री करावी.
७. सदर मृत्यू अपघात, हल्ला, विद्युत प्रवाहाचा धक्का, विषबाधा किंवा इतर कोणत्याही वन्यप्राणी विरहित कारणामुळे झालेला नाही, याची विशेषतः खात्री व पडताळणी वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी करावी व तसे प्रमाणीत करावे.
८. पोलिस तपास, शवविच्छेदन अहवाल आणि वनविभागाच्या प्रत्यक्ष क्षेत्रीय पुराव्यांच्या संयुक्त पडताळणी नंतरच मृत्यू

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झाल्याचे सहाय्यक वनसंरक्षक यांनी प्रमाणित करावे व पुढील कार्यवाही करण्यात यावी.

९. वरील घटनेची माहिती संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या 'प्रपत्र-अ' मध्ये घटना निर्देशनास आल्याचे २४ तासाचे आत उप वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांच्या स्वाक्षरीने मुख्य वन्यजीव रक्षक यांना ई-मेल द्वारे सादर करावी.

सर्व क्षेत्रीय कर्मचा-यांनी वरील प्रमाणे १ ते ९ नुसार संवेदनशीलतेने स्थानिक जन प्रतिनिधीच्या सहकार्याने कार्यवाही करावी. सर्व बाबींची योग्य नोंद ठेवाव्यात. प्रोटोकॉलचे पुर्ण पालन होईल याची दक्षता घ्यावी. या बाबतीत कोणताही निष्काळजीपणा केल्यास गांर्भियाने दखल घेऊन कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सहपत्र-** संदर्भिय पत्र

MARTHALA SHRINIVASA REDDY
Digitally signed by MARTHALA SHRINIVASA REDDY
Date: 2026.01.02 17:08:44 +05'30'

**(एम.श्रीनिवास रेड्डी)**
**मुख्य वन्यजीव रक्षक तथा**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**प्रतिलिपी**- १.अपर मुख्य सचिव (वने), महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीस सादर.
२.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांना माहितीस सादर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर, यांना माहितीस अग्रेषित.
४. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई, यांना माहितीस अग्रेषित.

महाराष्ट्र शासन
वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests(HoFF) Maharashtra State
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
Additional Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan" 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001.
Phone - 0712-2549563
pccfwlngp@mahaforest.gov.in
www.mahaforest.gov.in

**अत्यंत महत्वाचे** क्रमांक :-कक्ष-२३(४)/प्रक्र.१२३/१९-२०/४३७९ /२४-२५ दिनांक :- २९/११/२०२४.

प्रती,

१) महाव्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ मर्या नागपूर .

२) मुख्य वनसंरक्षक (प्रा)/वनसंरक्षक (प्रा)(सर्व)

३) क्षेत्र संचालक (व्याघ्र प्रकल्प) (सर्व)

४) उप वनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे/पुणे/नाशिक

विषय- मानवी मृत्यु प्रकरणात तात्काळ अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(४)/प्रक्र.१२३/२२-२३/२९१५ दिनांक १०/०१/२०२४.

राज्यात मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होत असुन, मानवी जिवीतहानी तसेच मनुष्य जखमी प्रकरणांमध्ये सुद्धा सातत्याने वाढ होत आहे. वन्यजीव हल्ल्यात मानवी जिवीतहानी होणे हा अतिशय संवेदनाशिल विषय आहे याची आपणास जाणीव आहेच. परंतु आपणाकडुन मानव जिवीतहानी प्रकरणाची माहीती तात्काळ या कार्यालयास कळविली जात नाही ही अंत्यत खेदाची बाब आहे.

वन्यप्रांण्याच्या हल्ल्यात मानव जिवीतहानी प्रकरणासंबधी आजच्या माहीती व तंत्रज्ञानाच्या काळात स्थानिक लोकप्रतिनिधींकडुन मा. मंत्री (वने) किंवा मा. प्रधान सचिव (वने) यांचेकडुन केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा तात्काळ केली जाते. मा. मंत्री (वने) किंवा प्रधान सचिव (वने) यांचेकडुन विचारणा करण्यात आल्यावर संबधित माहीती या कार्यालयास उपलब्ध न झाल्याने त्यांना माहीती सादर करणे शक्य होत नाही.

याकरिता आपणास निर्देशीत करण्यात येते की, मानव-वन्यजीव संघर्षात मानवी मृत्युची घटना घडल्यास तात्काळ किंवा जास्तीत जास्त तिन तासांचे आत या कार्यालयास ई-मेलद्वारे मानवी मृत्युच्या घटनेचा खालील तपशिल पाठविला जाईल याची गंभीरतेने नोंद घ्यावी.

**प्रपत्र-अ**

(१) वन विभाग -------------- वनपरिक्षेत्र ---------------------वर्तुळ ----------------

नियतक्षेत्र ------------------ कक्ष क्र./सव्हे क्र. -------------खाजगी शेत असल्यास गट क्र./भु.क्र.-----------

शेतमालकाचे नांव(लगेच माहीत झाल्यास) ------------घटना जंगलाबाहेर/जंगलाचे आंत ------------------

घटना व्याघ्र प्रकल्पाबाहेर अथवा आत------------वनक्षेत्रापासुन अंतर --------------किमी जीपीएस रिडींग----------

(२) मृत व्यक्तींचे नाव -------------------------- वय ------------- घटनेचा दिनांक ------------------

महीला/पुरुष-----------राहणार-----

(३)घटनास्थळी जाण्याचे प्रयोजन (गुरेचराई, जळाऊ लाकुड, संकलन, इत्यादि)------------------

(४) हल्ला करणारा वन्यप्राणी-------------------

(५) घटनास्थळावर आढळलेल्या हल्ला करणा-या वन्यप्राण्यांच्या खुणा------------------------.

(६) इस्पीतळात दाखल केले असल्यास इस्पीतळाचे नांव-------------------

(७) तातडीने देण्यात आलेली मदत ---------------------------

(८) घटनास्थळी भेट दिलेल्या अधिकां-यांचे नांव

१. ------------------हुद्दा ---------------संपर्क क्रमांक--------

२. ------------------हुद्दा ---------------संपर्क क्रमांक---------

३. ------------------हुद्दा ---------------संपर्क क्रमांक---------

(९) सदर हल्ला करणा-या प्राण्यामुळे पुर्वी झालेल्या घटना (मागील ३० दिवसात)------------------

(१०) सदर प्राण्यास जेरबंद करण्याचे आदेश आहेत काय ? होय / नाही------------------

(११) सदर क्षेत्रात मानवीहानी टाळण्यासाठी व प्राण्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्याकरिता केलेली उपाययोजना/प्रस्तावित उपाययोजना.

१) लावण्यात आलेले कॅमेरा ट्रॅप्स. २) प्राथमिक बचाव दल (PRT). ३) RRT व ईतर.

सन १ एप्रिल २०२४ ते आजतागत झालेल्या मनुष्य मृत्युच्या प्रकरणाचा तपशील वरील प्रपत्रामध्ये भरुन या कार्यालयास न चुकता सादर करावा. मानवी मृत्युच्या घटनेच्या प्रकरणाची माहीती घटना घडल्यापासुन २४ (चोवीस) तासांत ईतर अनुंषगीक माहीतीसह लेखी अहवाल या कार्यालयास न चुकता सादर होईल याची दक्षता घ्यावी. मानव- वन्यजीव संघर्षात मानवी मृत्युच्या प्रकरणी हयगय व टाळाटाळ करणा-या अधिकां-याविरोधात शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची गंभीरतेने नोंद घ्यावी.

**(विवेक खांडेकर)**
**मुख्य वन्यजीव रक्षक तथा**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

प्रतिलिपी :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) यांना माहितीकरिता अग्रेषित.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर/पश्चिम,मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.